**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ**

**दिनांक :- २५/१०/२०२१**

---

**विश्व चषक टि-२० क्रिकेट सामना भारत विरुध्द पाकिस्तान या टि-२० क्रिकेट सामण्यावर ऑनलाईन बेटींग/ सटटा खेळविणाऱ्या पुसद शहरातील सहा क्रिकेट बुकींनविरुध्द पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांचे मार्गदर्शनात धडाकेबाज कार्यवाही**

भारत विरुध्द पाकिस्तान या टी-२० क्रिकेट सामन्यावर पुसद शहरामध्ये ऑनलाईन बेटींग/सटटा खेळविल्या जात असल्याची गोपनिय माहीती मा. पोलीस अधीक्षक साहेब याना मिळाली सदर गोपनिय माहीती ची शहानिशा करुन कार्यवाही करणे करीता सायबर सेल व स्थानिक गुन्हे शाखा यांची पथके तयार करण्यात आली.

सदर गोपनिय माहीतीच्या आधारे दि. २४/१०/२०२१ रोजी पो.नि.दिपमाला भेंडे, स.पो.नि विवेक देशमुख, सपोनि अमोल पुरी, पोउपनि भगवान पायघण यांचे नेतृत्वातील पथकाने एकाच वेळेस पुसद शहरातील शेख समीर उर्फ कमरान शेख शमशु वय २४ वर्षे राहणार गांधीनगर पुसद, संदिप रावसाहेब देशमुख राहणार वसंतनगर, पुसद, कैलास लखनलाल साहु वय ४३ वर्षे राहणार रुग्वेद नगर कॅम्प पुसद या तिन ठिकाणी छापा कार्यवाही केली.

शेख समीर उर्फ कमरान शेख शमशु वय २४ वर्षे राहणार गांधीनगर पुसद याचे राहते घरावर छापा टाकला असता आरोपी नामे शेख समीर उर्फ कमरान शेख शमशु व अरविंद पवार दोन्ही रा. पुसद हे भारत विरुध्द पाकीस्तान या टी-२० क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोनद्वारे सटटा घेऊन पैश्याची बाजी लाऊन हार जितचा जुगाराचा खेळ खेळवितांना मिळुणे आले त्याचे ताब्यातुन एक लॅपटॉप, ७ मोबाईल व नगदी असा एकुण १,२३,५००/- रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

कैलास लखनलाल साहु वय ४३ वर्षे राहणार रुगवेद नगर, पुसद याचे राहते घरावर छापा टाकला असता आरोपी कैलास लखनलाल साहु रा. पुसद हाभारत विरुध्द पाकीस्तान या टी-२० क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोनद्वारे सटटा घेऊन पैश्याची बाजी लाऊन हार जितचा जुगाराचा खेळ खेळवितांना मिळुणे आले त्याचे ताब्यातुन एक लॅपटॉप, ५ मोबाईल, १ टिव्ही व नगदी असा एकुण १,२३,०००/- रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

संदीप रावसाहेब देशमुख वय ३३ वर्षे राहणार वसंतनगर, पुसद याचे राहते घरावर छापा टाकला असता आरोपी संदीप रावसाहेब देशमुख, बाळासाहेब रावसाहेब देशमुख दोन्ही रा. वसंत नगर, पुसद हे भारत विरुध्द पाकीस्तान या टी-२० क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोनद्वारे सटटा घेऊन पैश्याची बाजी लाऊन हार जितचा जुगाराचा खेळ खेळवितांना मिळुणे आले त्याचे ताब्यातुन २ मोबाईल, १ टिव्ही व नगदी असा एकुण ९४,६७०/- रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदर तिन्ही प्रकरणामध्ये एकुण ६ आरोपी अटक करण्यात आले असुन त्यांचे ताब्यातुन एकुण ३,४१,१७०/-रु चा मुददेमाल जप्त करुन आरोपी विरुध्द पो.स्टे. पुसद शहर येथे एक व पो.स्टे. वसंतनगर येथे दोन असे एकुण तिन गुन्ह कलम ४, ५ म.जु.का प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही डॉ. दिलीप पाटील-भुजबल पोलीस अधीक्षक, यवतमाळ, डॉ. के. ए. धरणे अपर पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांच्या आदेशाने प्रदिप परदेशी पोलीस निरीक्षक स्थागुशा, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि दिपमाला भेंडे, सपोनि अमोल पुरी, स.पो.नि विवेक देशमुख, पोउपनि भगवान पायघण, पोहवा गजानन डोंगरे, पोना विशाल भगत, कविश पाळेकर, उल्हास कुरकुटे, बबलु चव्हान, सुधिर पिदुरकर, पोकॉ महमद भगतवाले, सलमान शेख, पंकज गिरी, अजय निंबोळकर व चालक पोकॉ प्रविन कुथे सर्व पोलीस अधिक्षक कार्यालय , यवतमाळ यांनी पारपाडली.

२५/१०/२१

(डॉ.दिलीप पाटील- भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ